1 7 MAR 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनास मदत

## जैन मुनी अभिनंदन चंद्रसागर : दुर्मीळ हस्तलिखितांची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय हे ज्ञानभांडार, सरस्वतीचे मंदिर आहे. येथील दुर्मीळ हस्तलिखिते महत्त्वाची आहेत. या विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामासाठी सहकार्य करणार असल्याचे जैन मुनी अभिनंदन चंद्रसागर यांनी मंगळवारी येथे सांगितले. ते महाराष्ट्र विहारात कोल्हापूर भेटीला आले असून, त्यांनी विद्यापीठातील ग्रंथालयाला भेट देऊन तेथील हस्तलिखितांची पाहणी केली.



कोल्हापुरात मंगळवारी मुनीश्री अभिनंदन चंद्रसागर यांनी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांची भेट घेऊन त्यांना 'ध्यानामृत' ग्रंथ भेट दिला. यावेळी डावीकडून राजेश ओसवाल, विजय ककडे, बालमुनी महाराज उपस्थित होते.

ध्यान विषयाचा विशेष अभ्यास असणारे मुनीश्री अभिनंदन चंद्रसागर यांनी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची भेट घेऊन त्यांना 'ध्यानामृत' ग्रंथ भेट दिला. यावेळी ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. नमिता खोत यांनी दुर्मीळ हस्तलिखितांची माहिती दिली. यावेळी बालमुनी महाराज, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, गुजरीतील श्री संभवनाथ जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष राजेश ओसवाल, आदींची उपस्थिती होती. विद्यापीठातील जैन अभ्यास केंद्र आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी जिनसूत्र व्याख्यानमाला एप्रिलमध्ये ऑनलाइन होणार आहे. त्यामध्ये मुनीश्री अभिनंदन चंद्रसागर यांची व्याख्याने होणार आहेत.

लोकसत्ता

# वैश्विक, सौर किरणांमुळे वातावरणावरील परिणामांचा पन्हाळ्यावर अभ्यास होणार

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** वैश्विक व सौरकिरणांमुळे वातावरणातील वरच्या स्तरांमध्ये होणाऱ्या बदलांचा व घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणे शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा अवकाश संशोधन केंद्रामध्ये बसविण्यात येणार आहेत. अहमदाबाद व हैदराबादपाठोपाठ अशी सुविधा असणारे कोल्हापूर हे देशातील तिसरे केंद्र आहे. ही माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा, अहमदाबाद आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात २०२१ साली वातावरणातील मध्यांबर (मेसोस्फियर) -दलांबर (आयनोस्फियर) -उष्मांबर (थर्मोस्फियर) या जमिनीपासून ५० किमी ते ५०० किमी एवढ्या अंतरामध्ये उत्सर्जित होणाऱ्या एकाधिक तरंगलांबीच्या प्रकाश किरणांचा अभ्यास करण्यासाठी सामंजस्य करार झाला होता.

यातर्गत भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा, अहमदाबाद यांच्याकडून सुमारे १ कोटी किमतीची उपकरणे पन्हाळा अवकाश संशोधन केंद्रामध्ये बसवण्यात येणार आहेत. या वेधशाळेच्या निर्मितीसाठी शिवाजी विद्यापीठाकडून सुमारे २२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या उपकरणांमध्ये सीसीडी-आधारित मल्टीवेव्हलेंथ एअरग्लो फोटोमीटर आणि पीआरएल-एअरग्लो इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांचा समावेश आहे. पदार्थविज्ञान अधिविभागाचे डॉ. राजीव व्हटकर या संदर्भातील पुढील कार्यवाही करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 MAR 2022

तरुण भारत

# पन्हाळा अवकाश संशोधन केंद्रात आधुनिक उपकरणे

## वैश्विक, सौर किरणांमुळे वातावरणातील बदलांचा, घडामोडींचा होणार अभ्यास

प्रतिनिधी
कोल्हापूर

वैश्विक व सौरकिरणांमुळे वातावरणातील वरच्या स्तरांमध्ये होणाऱ्या बदलांचा व घडामोडींचा अभ्यास शिवाजी विद्यापीठामध्ये करणे आता शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणे विद्यापीठाच्या पन्हाळा अवकाश संशोधन केंद्रामध्ये बसविण्यात येणार आहेत. अहमदाबाद व हैदराबाद पाठोपाठ अशी सुविधा असणारे कोल्हापूर हे देशातील अवघे तिसरे केंद्र आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरूंनी म्हणाले, भारत सरकारच्या अंतरिक्ष विभागाअंतर्गत येणाऱ्या भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा, अहमदाबाद आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात २०२१ साली वातावरणातील मध्यांबर (मेसोस्फियर) –दलांबर (आयनोस्फियर) –ऊष्मांबर (थर्मोस्फियर) या जमिनीपासून ५० किमी



▪ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

ते ५०० किमी एवढ्या अंतरामध्ये उत्सर्जित होणाऱ्या एकाधिक तरंगलांबीच्या प्रकाश किरणांचा अभ्यास करण्यासाठी सामंजस्य करार झाला होता. या करारांतर्गत भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा, अहमदाबादकडून सुमारे १ कोटी किमतीची उपकरणे विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये बसवण्यात येणार आहेत. ही उपकरणे बसविण्यासाठी लागणाऱ्या वेधशाळेच्या निर्मितीसाठी विद्यापीठाकडून सुमारे २२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या उपकरणांमध्ये सीसीडी–आधारित मल्टीवेव्हलेंथ एअरग्लो फोटोमीटर आणि पीआरएल– एअरग्लो इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांचा समावेश आहे. भारतात अशा प्रकारच्या सुविधांनीयुक्त वेधशाळा सध्या अहमदाबाद आणि हैद्राबाद येथेच कार्यान्वित आहेत. येत्या काही महिन्यांत विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राचे नाव या यादीत समाविष्ट होणार आहे. या तिन्ही केंद्रांद्वारे एकत्रितरित्या संशोधन करून वैश्विक आणि सौर किरणांमुळे वातावरणातील घडामोडी आणि बदलांचा सविस्तर अभ्यास करता येणार आहे. विद्यापीठात अवकाश संशोधनासाठी लागणाऱ्या सुविधेमध्ये वाढ होणार असून, याचा उपयोग होणार आहे. पदार्थविज्ञान अधिविभागाचे डॉ. राजीव व्हटकर या संदर्भात संशोधन करीत आहेत.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहात शुल्क ऑफलाईन भरण्याची सुविधा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दहा वसतीगृहाचे प्रवेश सुरू झाले आहेत. दहा वसतिगृहात जवळपास ८०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यापैकी ३५० विद्यार्थी वसतिगृहात राहण्यासाठी आले आहेत. गेले काही दिवस वसतिगृहाचे ऑनलाईन शुल्क भरण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे ऑनलाईन शुल्क भरण्यास अडचण येत असलेल्यांनी ऑफलाईन शुल्क भरावे, असे आवाहन वसतीगृह अधीक्षक डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी केले आहे. दोन वर्षापासून वसतिगृहे बंद होती. कोरोना कमी झाल्यानंतर महाविद्यालये, वसतिगृह १०० टक्के क्षमतेने सुरू झाली आहेत. ३८ अधिविभागांना प्रवेश घ्यावा, असे पत्र पाठवले होते. त्यानुसार आठ दिवसात जवळपास ८०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

तरुण भारत

# मुरगुडच्या स्वातीने कुस्तीत मिळवले सुवर्ण

**मुरगूड :** हरियाणाच्या भिवानी येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विश्वविद्यालय महिला कुस्ती स्पर्धेत मुरगुडच्या नंदिनी साळोखे पाठोपाठ आज दुसऱ्या दिवशी स्वाती शिंदेनेही ५३ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले.



महिला कुस्तीमध्ये सलग दोन सुवर्णपदकांच्या कमाईचा इतिहास शिवाजी विद्यापीठात प्रथमच रचला गेला.

५३ किलो वजन गटात मधील जालंदर विद्यापीठाच्या अल्फाबरोबर झालेल्या पहिल्या सामन्यात मोळी डावावर १०–० अशा गुणाधिक्याने चितपट करत स्वातीने एकतर्फी विजयाची सलामी दिली. त्यानंतर भिवानी विद्यापीठाच्या कांचनाबेन हिच्यावर कलाजंग डावावर चितपट करीत स्वातीने आगेकूच केली. पुढे भरतपूर विद्यापीठाच्या शिवानी हिला भारंदाज डावावर चितपट केले. त्यानंतर स्वातीने गुरुनानक विद्यापीठाच्या समनप्रीत कौर हिला दूहेरी पटकाढून डावावर चितपट केले आणि सेमीफायनल फेरी गाठली.

उपांत्य लढतीमध्ये एमडीयू रोहतक आंतरराष्ट्रीय पदक खेळाडू अंजली बरोबर झालेल्या अटीतटीच्या लढतीत निकाल डावावर चीतपट करीत अंतिम फेरी गाठली. चौधरी देवीलाल विद्यापीठ हरियानाच्या या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या संगीताबरोबर झालेल्या अंतिम अटीतटीच्या लढतीत ६–४ गुण फरकाने विजय मिळवत सुवर्णपदकाला गवसणी घातली. शिवाजी विद्यापीठाचे टीम व्यवस्थापक डॉ. कदम –पाटील आणि नागरे – पाटील तसेच विजेत्या स्वातीला एमआयएस कोच दादासो लवटे, प्रा. रवी चव्हाण, वस्ताद सुखदेव येरुडकर, दयानंद खतकर, सागर देसाई यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

### नंदिनी पाठोपाठ स्वाती

स्वाती खेळलेल्या ५३ किलो वजन गटांमध्ये स्पर्धेत ९० महिला सहभागी झाल्या होत्या. स्वाती ही देवचंद कॉलेज अर्जुननगर निपाणी येथे एम. ए. प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. या विजयाबद्दल आनंदोत्सव करण्यात आला.